| CNR No.MHWR040014522018 | नोंदणी दिनांक | – | १०/१०/२०१८ |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | – | १०/१०/२०१८ |
| | निकाल दिनांक | – | २७/०३/२०२६ |
| | कालावधी | | वर्ष. म. दि.<br>०७ ०५ १७ |

**निशाणी क्र.०४ पुढे**

**नमुना क्र.३२**

**पार्ट-अ**

**(न्यायनिर्णयाची शिर्षक पृष्ठ)**

**फौजदारी नियमावली प्रकरण क्र. ६ चा परिच्छेद ४४ (i)**

**सेलु येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**

**ता. सेलु, जि. वर्धा**

**(पिठासीन अधिकारी – एस.आर.सातभाई)**

न्यायनिर्णय घोषीत दिनांक २७/०३/२०२६

**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१०८६/२०१८)**

गुन्हा नोंद क्र. २५३/२०१८, पोलीस स्टेशन सेलू, ता. सेलू, जि.वर्धा

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत पोलीस निरिक्षक, पो.स्टे.सेलू. |
| **अभियोगपक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता –<br>श्रीमती व्ही.एम.गजभिये |
| **आरोपी** | १. | **प्रफुल माणिकराव वानखेडे,**<br>वय – ४९ वर्षे, व्यवसाय – नोकरी,<br>राहणार – प्लॉट क्र.२०, रामचंद्र नगर, बेसा रोड,<br>हुडकेश्वर, ता. व जि. नागपूर. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | | श्री. आर.आर.पाटील |

**भाग – ब**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २५/०४/२०१८ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २६/०४/२०१८ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | १०/१०/२०१८ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०४/०७/२०२२ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | ०४/०७/२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | २७/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशांचा दिनांक | :- | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (**Set Off**) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रफुल्ल माणिकराव वानखेडे | ०१/०६/२०१८ | ०१/०६/२०१८ | भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३०४-अ मो.वा.का. कलम १८४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**भाग –क**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))**

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार.**

**अ. अभियोग पक्ष**

| सा. | साक्षीदारांचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | सतिश पुंजारामजी काटोरे | साक्षीदार | ०४ पुढे |
| २. | श्रद्धा राजेश उईके | साक्षीदार | ०४ पुढे |
| ३. | बबन गुलाबराव मसराम | साक्षीदार | ०४ पुढे |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार –**

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

**क. न्यायालयीन साक्षीदार –**

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

अ. अभियोग पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | नाही | |

ब. बचाव पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | नाही | |

क. न्यायालयामार्फत निशाणी फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा.

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | --- | --- |

ड. भौतीक वस्तु -

| अनु क्रमांक | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| | --- | --- |

# न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक : २७/०३/२०२६)

अभियोगपक्षाने सदर खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७, ३०४-अ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ अंतर्गत दाखल केला आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे –**

२. दि.२५/०४/२०१८ रोजी २१.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादी हे आपले मोटरसायकल क्र.एम.एच-३२-ए डी-४७७२ स्पलेंडर गाडीने रेहकीवरुन सेलूकडे येत असतांना किनकर कॉलेज जवळ सेलू कडुन येणारी इंडिका कार क्र.एम.एच-३१-सी आर-१२७३ चा चालक आरोपी यांने आपले वाहन भरधाव व निष्काळजीपणाने चालवुन समोरील येणारी

फिर्यादीची मोटरसायकलला धडक दिली. त्यामुळे फिर्यादी व त्यांचे सोबत असलेले राजु उईके यांच्या पायाला व फिर्यादीचे मोटरसायकलला धडक देउन अपघात करुन जखमी केले. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन सेलू येथे रिपोर्ट दिली. सदरची रिपोर्ट पोलीस स्टेशन सेलू येथे अपराध क्र.२५३/२०१८ भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७ व मोटरवाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केले.

३. तपासकामी तपासी अधिकारी श्री. सौरभ चंद्रकांत घरडे यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला. आरोपीला अटक करुन अटक फॉर्म तयार केले. वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. वाहनाचे कागदपत्र प्राप्त केले. आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने, त्याचे विरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये आरोप ठेवुन निशाणी क्र.०४ पुढे आरोपीचा तपशील नोंदविला. त्यातील मजकूर आरोपीला वाचून दाखविला व त्याला मराठी भाषेमध्ये समजावून सांगण्यात आला. आरोपीने ते अमान्य करुन प्रकरण चालविण्यासाठी विनंती केली. आरोपीविरुद्ध अभियोगपक्षाने नोंदविलेल्या साक्षीपुराव्यातुन गुन्हयाशी संबंधीत पुरावा अभिलेखावर आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१) (ब) नुसार बयान नोंदविण्यात आले असुन आरोपीने सदरची केस त्याला काही माहित नसल्याचा तसेच खोटी केस केल्याचा बचाव घेतला आहे. प्रस्तुत

प्रकरणात विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये तसेच आरोपीतर्फे विद्वान वकील आर.आर.पाटील यांच्या युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. अभियोगपक्षाचे म्हणणे विचारात घेता, खालील बाबी विचारार्थ येत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक २५/०४/२०१८ रोजी २१.०० ते २१.२० वाजताच्या सुमारास मौजा सेलू ते रेहकी रोड सेलू, येथे सार्वजनिक रस्त्यावर आरोपीने त्याच्या ताब्यातील इंडिका कार क्र.एम.एच–३१–सी आर–१२७३ ही मनुष्य जिवीतास किंवा सुरक्षीततेस धोका पोहचेल किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापात अगर क्षती पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे, अशी हयगयीने व निष्काळजीपणाने चालवून अपघात केला, त्याप्रमाणे आरोपीने भारतीय दंड विधानचे कलम २७९ अंतर्गत गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| २. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपीने त्याच्या ताब्यातील इंडिका कार क्र.एम.एच–३१–सी आर–१२७३ ही मनुष्य जिवीतास किंवा सुरक्षीततेस धोका पोहचेल किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापात अगर क्षती पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे, अशी हयगयीने व निष्काळजीपणाने चालविले ज्यामुळे राजेश विठ्ठलराव उईके यांना जबर दुखापत होउन त्यांचा मृत्यु झाला जो सदोष मनुष्यवध आहे, त्याप्रमाणे आरोपीने भारतीय दंड विधानचे कलम ३०४–अ अंतर्गत गुन्हा केला ? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ३. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर त्याच्या ताब्यातील इंडिका कार क्र.एम.एच–३१–सी आर–१२७३ भरधाव वेगाने बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविली तसेच इतरांचे जीवन किंवा व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून साधी दुखापत पोहोचविण्यास कारणीभूत झाले, त्याप्रमाणे आरोपीने भारतीय दंड विधानचे कलम ३३७ अंतर्गत गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ४. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील इंडिका कार क्र.एम.एच–३१–सी आर–१२७३ वाहन भरधाव वेगात हयगयीने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविले, त्याप्रमाणे आरोपीने मोटर वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे आरोपी निर्दोष मुक्त. |

## ...कारणमिमांसा...

६. अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर त्याच्या ताब्यातील वाहन मनुष्य जिवीतास किंवा सुरक्षीततेस धोका पोहचेल किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापात अगर क्षती पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे, अशी हयगयीने व निष्काळजीपणाने चालवून अपघात केला. तसेच आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने चालवुन राजेश विठ्ठलराव उईके यांना जबर दुखापत केली व त्यामुळे त्यांचा मृत्यु झाला जो सदोष मनुष्यवध आहे, हे ही अभियोगपक्षास निःसंशयपणे सिद्ध करणे आवश्यक आहे.

**मुद्दे क्र.१ ते ४ करीता :**

७. वरील सर्व मुद्दे एकाच प्रकारच्या पुराव्यावर अवलंबुन आहेत. त्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरचे मुद्दे एकत्रात विचारार्थ घेत आहे.

८. अभियोगपक्षाने आरोपीवरील गुन्हे सिद्ध करण्यासाठी साक्षीदार क्र.१ सतिश पुंजारामजी काटोरे यांना निशाणी क्र.०४ पुढे नोंदविण्यात आली आहे. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, तक्रारकर्ता नितीन हा त्यांचा भाऊ होता, तो दि.०९/१०/२०२२ मध्ये मरण पावला. घटना दि.२५/०४/२०१८ रोजी सेलू ते रेहकी रस्त्यावर किनकर शाळेजवळ अंदाजे रात्री ०८.३० ते ०९.०० वाजताच्या दरम्यान घडली होती. त्यादिवशी त्यांचे आतेभावाचे मौजा रेहकी येथे रिसेप्शन असल्याने ते व त्यांचा भाऊ नितीन जेवन करुन परत येत होते. त्यांचा भाऊ नितीन हा राजू उईके यांच्या मोटरसायकलवर बसला होता व त्यांचे मागे ते मोटर सायकलने निघाले. एक इंडिका कार क्र.एम.एच–३१–१२७३ क्रमांकाचे कार भरधाव वेगाने नागमोडी सारखी समोरुन आली आणि राजु उईके यांच्या मोटरसायकलला धडक दिली. त्यामुळे राजु उईके आणि त्यांचा भाऊ नितीन हे मोटरसायकलवरुन फेकल्या गेले. आरोपी यांनी त्याची गाडी थांबवुन फोनवर बोलत असतांना त्यांना पाहुन तो पळुन गेला. राजु आणि त्यांच्या भावाला पायाला आणि हाताला मार लागला होता. त्यांनी फोनकरुन सेवाग्राम येथे रुग्णवाहिका बोलावून घेतली व त्या रुग्णवाहिकेने त्यांच्या भावाला आणि राजुला सेवाग्राम येथील दवाखान्यात नेले. राजु उईके यांना सेवाग्राम वरुन नागपूर येथे उपचाराकरिता नेले, परंतु तो नागपूर येथे मरण पावला. त्यांचा भाऊ सेवाग्राम येथील दवाखान्यात उपचार घेत

होता. पोलीसांनी घटनेबाबत त्यांचे बयान घेतले होते. धडक देणा–या वाहनाच्या चालकास त्यांनी न्यायालयात आळखले. आरोपीतर्फे घेतलेल्या उलटतपासामध्ये सदरचे साक्षीदाराने नाकारले आहे की, घटना प्रत्यक्ष त्यांच्या समक्ष घडली नाही.

९. अभियोगपक्षाने आरोपीविरूध्द दोषारोपीत गुन्हे सिध्द करण्यासाठी व अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ च्या साक्षीला दुजोरा मिळण्याकरिता, अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ हिला निशाणी क्र.०४ पुढे नोंदविण्यात आले आहे. साक्षीदाराने तिच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, दि.२५/०४/२०१८ रोजी तिचे पती यांचा अपघात रेहकी ते सुरगांव मार्ग, किनकर कॉन्वेंट येथे झाला होता. अपघात झाला त्या वेळेस ती आमगांव येथे होती. तिला तेथे फोनवरुन कळाले की, तिच्या पतीचा अपघात झाला आहे. सदरचा फोन तिच्या भावाने शेजारी केला होता. भावाने तिला फोनवर सांगितले होते की, भाऊजींचा अपघात झालेला आहे, पैसे घेवुन सेवाग्राम हॉस्पीटलला ये, त्याप्रमाणे ती पैसे घेवुन सेवाग्राम हॉस्पीटलला गेली. तेथे तिच्या पतीला उपचार सुरु होते. तेथे गेल्यावर तिला समजले की, तिच्या पतीसोबत गाडीवर सिंदी रेल्वेतील एक व्यक्ती बसुन होता. त्याचा ही अपघात झालेला आहे. तेथे तिने दोघानांही जखमी अवस्थेत पाहिले होते. तिच्या पतीला हाताला, पायाला व डोक्याला लागलेला होता व दुस–या इसमाला पायाला लागलेले होते. सेवाग्राम हॉस्पीटलला तिला तिच्या पतीला नागपूरला घेवुन जाण्यासाठी सांगितले.

त्याप्रमाणे तिने ट्रिट–मी (Treat me) या हॉस्पीटलला घेवुन गेले. उपचारादरम्यान तिच्या पतीचा तेथे मृत्यु झाला. सदरचा अपघात हा इंडिका या चारचाकीने तिच्या पतीला उडविल्याचे तिचे भाऊ बबन मेश्राम यांनी सांगितले. पोलीसांनी तिच्या कडुन चौकशी केली नाही व बयान नोंदविले नाही. आरोपीतर्फे घेतलेल्या उलटतपासामध्ये सदरचे साक्षीदाराने मान्य केले आहे की, अपघाताबाबतची माहिती तिला एकीव आहे, प्रत्यक्ष अपघाताबाबत तिला माहिती नाही.

**१०.** अभियोगपक्षाने आरोपीविरूध्द दोषारोपीत गुन्हे सिध्द करण्यासाठी व अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ व २ च्या साक्षीला दुजोरा मिळण्याकरिता, अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांना निशाणी क्र.०४ पुढे नोंदविण्यात आले आहे. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, सन २०१८ मध्ये त्यांचे जावईचा अपघात रेहकी रोड येथे झाला होता. एका व्यक्तीने त्यांच्या जावईच्या फोनवरुन फोनकरुन सदर अपघाताची माहिती दिली होती. त्यांच्या जावईला एंबुलंस मधुन घेवुन जात असतांना ते सेलू येथुन एंबुलंस बरोबर हॉस्पीटलला गेले. अपघाताच्या वेळेस त्यांच्या जावईबरोबर सिंदीचा एक व्यक्ती होता. सेवाग्राम हॉस्पीटलमध्ये जावईचा व त्या व्यक्तीचा उपचार सुरु करण्यात आला. तेथुन त्यांना त्यांच्या जावईला नागपूरला घेवुन जाण्यासाठी सांगितले. त्यांना नागपूर नेण्यात आले. उपचारादरम्यान जावईचा दोन दिवसांनी मृत्यु झाला. सदरचा अपघात हा कारने झाल्याचे त्यांना समजले. आरोपीतर्फे घेतलेल्या

उलटतपासामध्ये सदरचे साक्षीदाराने मान्य केले आहे की, अपघाताबाबतची माहिती त्यांना एकीव आहे, प्रत्यक्ष अपघाताबाबत त्यांना माहिती नाही.

११. उपलब्ध साक्षपुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता असे दिसुन येते की, साक्षीदार क्र.१ यांने आरोपी हा अपघातानंतर गाडी थांबवुन फोनवर बोलत असतांना त्यांना पाहुन तो पळुन गेला असे त्यांनी त्याच्या साक्षी पुराव्यात सांगितले आहे. परंतु सदरची बाब त्यांने पोलीसांना त्याच्या बयानात सांगितलेली नाही. उलटतपासात सदरचा साक्षीदाराने सदरची बाब पोलीसांना सांगितल्याचे नमूद केले परंतु ते त्याच्या बयानात का नाही याचे कारण तो सांगु शकत नसल्याचे त्यांनी सांगितले. प्रस्तुतची बाब सिद्ध करण्याकरिता अभियोगपक्षाने तपासी अंमलदार यांना तपासलेले नाही. अभियोगपक्ष साक्षीदार क्र.२ व ३ यांने अपघात झाल्याचा उल्लेख केला असला तरी ते प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसुन त्यांनी आरोपी हा संबंधीत वाहन चालवित होता, याबाबत ठोसपणे सांगितलेले नाही. सदरच्या साक्षीदारांनी त्यांच्या उलटतपासात ते एकीव साक्षीदार असल्याचे तसेच त्यांना घटनेबाबत प्रत्यक्ष माहिती नसल्याचे सांगितले आहे. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासलेले नाही. तसेच अभियोगपक्षाने एकही पंच साक्षीदारांना तपासले नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा हा सिद्ध झालेला नाही. प्रस्तुतच्या प्रकरणात फिर्यादी हे मरण पावल्यामुळे त्यांची साक्ष अभिलेखावर आलेली नाही. त्यामुळे फिर्याद व छापील प्रथम खबर अहवाल ही सिद्ध झालेला नाही.

१२. प्रस्तुत प्रकरणात तपासी अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांना तपासले नाही आणि तपासातील भरपूर सा–या गोष्टी अभिलेखावर आलेल्या नाही. त्यामुळे अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे कोणतीही घटना घडली होती यावर विश्वास बसत नाही. त्यामुळे अभियोगपक्ष आरोपीवरील आरोप सिध्द करण्यास सपशेल अपयशी ठरला आहे. तसेच आरोपीविरूध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीने भा.दं.वि.चे कलम २७९, ३३७, ३०४–अ व मोटरवाहन कायद्याचे कलम १८४ नुसार गुन्हा केल्याची बाब सिध्द झालेली नाही. वरील विवेचनावरुन मी मुद्दे क्र.१ ते ४ चे नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ बाबत :**

१३. उपरोक्त पुराव्याचे विश्लेषण करता व एकंदर कायदेविषयी परिस्थितीचा बारकाईने विचार करता, अभियोग पक्ष आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. सबब, उपरोक्त गुन्हयातून साक्षपुराव्या अभावी संशयाचा फायदा देउन आरोपीची निर्दोष मुक्तता करणे मला न्यायोचित वाटते. परिणामत: मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **प्रफुल्ल माणिकराव वानखेडे** याची भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) [फौजदारी प्रक्रीया संहिताचे कलम २४८(१)] अन्वये गुन्हा क्र.२५३/२०१८ भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३०४–अ व मोटरवाहन कायद्याचे कलम

१८४ अन्वये पोलिस स्टेशन सेलू, या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. अपराध क्र.२५३/२०१८ मध्ये भरलेली सुरक्षा राशी रक्कम जर असले तर आरोपीला अपिल कालावधी संपल्यानंतर परत करण्यात यावी.

४. आरोपीने रक्कम रु. १५,०००/- चा वैयक्तीक मुचलका भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ] प्रमाणे दाखल करुन पुर्तता करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI Date: 2026.03.30 18:29:06 +0530

(एस.आर.सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
सेलू, जि.वर्धा

**दिनांक** : २७/०३/२०२६

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)